

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

Title Code- MAHMAR-51647

संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६६३. वा | शुक्रवार | दि. २६ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# श्रध्देचा बाजार भरवून भाजप निवडणुकांच्या तयारीस लागला – ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल...



वृत्तसंस्था/मुंबई

अयोध्येतील राम मंदिर लोकार्पण आणि रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात २२ जानेवारी रोजी करण्यात आली. या कार्यक्रमात सर्वांचं लक्ष होतं ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर.प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर सायंकाळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नाशिकच्या जाहीर सभेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपवर टीका केली. त्यानंतर आज शिवसेनेचं (ठाकरे गट) मुखपत्र असलेल्या सामनातून श्रद्धेचा बाजार भरवून भाजप निवडणुकांच्या तयारीस लागला असल्याचं टीकास्त्र सोडण्यात आलं आहे. याला भाजपकडून कसं उत्तर मिळते हे पहावे लागणार आहे. आजच्या सामना च्या अग्रेलखातून ठाकरेंनी भाजपवरही सडकून टीका केली. श्रीराम जन्मभूमी सोहळा हा रामाचा कमी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाच जास्त होता. मंदिर श्रीरामाचे की, मोदींचे होत आहे? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. म्हणूनच भाजपमुक्त श्रीरामाची हाक नाशकात दिली व ती योग्यच आहे. महाराष्ट्रातील अनेक मंदिरे ही बडवे, दलाल वगैरेंच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी आंदोलने झाली आहेत. नाशिकच्या काळाराम मंदिरात दलित, बहुजनांना प्रवेश मिळावा यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आंदोलन केले होते. आता अयोध्येतील श्रीराम मंदिर हे भाजपच्या बडव्यांच्या ताब्यात जाऊन तेथे श्रद्धेचा राजकीय अपहार होणार असेल तर प्रभू रामांना भाजपमुक्त करावे लागेल. जे भाजपला मत देतील त्यांना अयोध्येतील रामलल्लांचे मोफत दर्शन करण्याची मुक्ताफळे याआधी भाजपच्या नेत्यांनी उधळलीच आहेत. त्यामुळे श्रीरामांच्या अस्तित्वाची भक्तांना चिंता वाटते. श्रद्धेचा हा बाजार भरवून भाजप लोकसभा निवडणुकांच्या तयारीस लागला आहे व ते चित्र महाराष्ट्रातदेखील दिसत असल्याचा आरोप ठाकरेंकडून करण्यात आला आहे. देशात सध्या अनेक प्रश्नांनी उसळी मारली आहे. रामाचे मंदिर झाले, आता देशाच्या व लोकांच्या कामाचे बोला, पण महाराष्ट्राचे किंवा देशाचे मोदी सरकार कामाचे बोलायला तयार नाही. अयोध्येत रामलल्लांच्या दर्शनासाठी झुंबड उडाली आहे. यातच भाजप खूश आहे. लाखोंचे जत्थे रामजन्मभूमीच्या दिशेने निघाले आहेत. हे सर्वसामान्य भक्त आहेत. त्यात शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार तरुणांचा भरणा जास्त आहे. रामाचे दर्शन झाले तरी त्यांच्या हातांना काम, शेतकऱ्यांच्या मालास भाव हा सरकारलाच द्यावा लागेल. महाराष्ट्रातील आमदारांना खोके मिळतात; पण कांदा, कापूस, सोयाबीन उत्पादकांना भाव मिळत नाही. दूध उत्पादकांचे वांधेच आहेत. उद्योगपतींच्या कर्जाची रोज माफी होते. अजित पवारांचा सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळाही माफ झाला, पण पाच-दहा हजारांच्या कर्जापायी शेतकऱ्यांच्या घरांवर जप्तीची कारवाई सुरू आहे. प्रभू श्रीरामाच्या झुंबड गर्दी दर्शनाने या कारवाया थांबणार असतील तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रामभक्तांनी तसे सांगावे असा थेट सवालही आजच्या सामना अग्रलेखातून ठाकरेंनी विचारला आहे. देशातील समस्यांवरही भाष्यं करत ठाकरेंनी भाजपवर निशाणा साधला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोजच होत आहेत. त्यावर राममंदिराचा सोहळा हा तोडगा आहे काय? महाराष्ट्रात भ्रष्टाचार ताडामाडासारखा वाढला आहे. श्रीरामास हे मान्य होणार नाही, पण भ्रष्ट हात श्रीरामांच्या भजनात टाळ कुटत बसले आहेत. महाराष्ट्रातले हे ढोंग विचित्र आहे. लबाड लांडग्यांचे राज्य महाराष्ट्रात आहे व राष्ट्रवादाचे कातडे ओढलेले लोक देशावर राज्य करीत आहेत. श्रीराम त्यांच्या कात्रीत सापडला आहे. अयोध्येची पुढची लढाई ही भाजपमुक्त श्रीरामासाठीच करावी लागेल असे चित्र आहे. रामासाठी सामान्यांनी बलिदान दिले. त्या रामाची सूत्रे ढोंगी व लबाड लांडग्यांच्या हाती गेली. मंदिरे भ्रष्टाचारमुक्त व ढोंगमुक्त हवीत. अयोध्येत जे सुरू आहे त्याकडे आणि देव नव्या बडव्यांच्या ताब्यात गेले आहेत का याकडे बारकाईने वे लागेल. रामाचे गुदमरणे भक्तांनीच थांबवायला हवे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय मतदार दिवस विविध उपक्रमांनी साजरा

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाच्या वतीने शारदा ज्ञानपीठ येथे राष्ट्रीय मतदार दिवसानिनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाला शारदा ज्ञानपीठचे अध्यक्ष डॉ. देशपांडे बुलढाणा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहसिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, शरद पाटील, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, तहसिलदार रूपेश खंडारे, गटविकास अधिकारी सरीता पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात शारदा ज्ञानपीठ, श्री शिवाजी विद्यालय, एडेड हायस्कूल, पंकज लध्दड अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित पोस्टर, रांगोळी, चित्रकला स्पर्धेच्या प्रदर्शनीची पाहणी केली. तसेच विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी मतदानाचे महत्व समजावून सांगून उपस्थित विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी करून भविष्यात जागरूक मतदार होण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील लोकसंख्या, मतदार, मतदारांची टक्केवारी, मतदारयादीतील इतर तपशिलाची माहिती दिली. जिल्हाधिकारी यांनी विशेषत: नवीन मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करून नोंदणी सुलभ करणे आणि जास्तीत जास्त नोंदणी, मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेची माहिती देऊन सहभाग वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी नवमतदारांचा सत्कार करण्यात आला. त्यांना राष्ट्रीय मतदार दिवस समारंभात मतदार फोटो ओळखपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमात राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त लोकशाही निष्ठा ठेवण्यासंबधी शपथ देण्यात आली

## सेस फंड योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

जनसंचलन/बुलडाणा



जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्फे सेस फंड योजना राबविण्यात येते. या योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून आता दि. १० फेब्रुवारी २०२४ पर्यंत अर्ज करता येणार आहे. जिल्हा परिषदेच्या २० टक्के सेस फंड योजनेंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी मागासवर्गीय शेतकऱ्यांना, मागासवर्गीय आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीस १०० टक्के अनुदानावर ५ एचपी विद्युत मोटार पंप, एचडीपीई पाईप, मागासवर्गीय महिलांकरीता शिलाई मशिन पुरविण्याची योजना घेण्यात आली आहे. सदर योजनेचे अर्ज पंचायत समितीस्तरावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मागासवर्गीय शेतकरी व महिला लाभार्थ्यांनी परीपूर्ण अर्ज अनुषंगिक सर्व कागदपत्रासह संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयाकडे सादर करावेत. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांनी केले आहे.

# असोला शिवारातील त्या युवतीच्या हत्येचा तपास करणार सहा पथके




**जनसंचलन/ चिखली**

चिखली- देऊळगाव राजा महामार्गावरील असोला शिवाराात एका अनोळखी युवतीचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आल्याचे २३ जानेवारी रोजी समोर आले होते. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिसांनी सहा पथके स्थापन केली आहेत. पुढील तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे तीन पथके, उपविभागीय पोलिस अधिकारी यांचे एक पथक आणि अंढेरा पोलिसांचे दोन पथकं असे एकूण सहा पुढील वेगवेगळ्या ठिकाणी रवाना केली आहेत. परंतु तब्बल ३६ तास उलटूनही त्या निष्पाप महिलेच्या मरणानंतरही मरण यातना काही केल्या संपेनात, तब्बल छत्तीस तास उलटूनही या महिलेचे शिवविच्छेदन अकोला येथील शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांनी केले नव्हते. त्यामुळे, अंढेरा पोलिस स्टेशनचे पीएसआय हरिहर गोरे, कर्मचारी पोहेकॉ. कैलास उगले, खार्डे, महिला पोलिस कर्मचारी ज्योत्स्ना गवई आदी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात आहेत.

# आरक्षण सर्वेच्या ॲपमध्ये बौद्ध धर्माचा रकानाच नाही

## बौद्धांचे अस्तित्व शून्यावर आणण्याचा घाट - सतीश पवार यांचा आरोप

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठा आरक्षणासंदर्भात राज्य मागास-वर्गीय आयोगाच्या वतीने करण्यात येत असलेल्या जातनिहाय जनगणनेच्या सर्वे क्षण ॲपमध्ये बौद्ध धर्माचा रकानाच नसल्याचे आढळून आले आहे. अंतिम जनगणना झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये बौद्ध धर्माचे अस्तित्व दिसून येणार नाही. धर्माच्या कॉलममध्ये धर्माचा उल्लेख होत नसल्याने बौद्ध धर्मातील नागरिकांची संख्या शून्यावर येईल. एका अर्थाने बौद्ध धर्म संपुष्टात आणण्याचेच हे कटकारस्थान आहे, असा आरोप वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी केला आहे. होत असलेली जातनिहाय जनगणना सदोष असल्याने सर्वेक्षण तातडीने थांबवून बौद्ध धर्माचा उल्लेख असलेले ॲप कर्मचाऱ्यांना दिल्यानंतरच नव्याने जातीय जनगणना करण्यात यावी, अशी मागणी पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह शासनाकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटल्यानुसार, २३ जानेवारी २०२४ पासून मराठा आरक्षणासंदर्भात जातीय जनगणना सुरू करण्यात आली आहे. जातनिहाय जनगणना करण्याचे काम शासकीय कर्मचाऱ्यांकडून केले जात आहे. जनगणनेसंदर्भात माहिती जमा करण्यासाठी अथवा भरण्यासाठी एक विशिष्ट ॲप कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहे. वास्तविक पाहता ही जनगणना करत असताना मराठा समाजातील बांधवांकडे ओबीसी समूहाची जुनी नोंद, दाखले आहेत किंवा नाही हे पाहणे याद्वारे अपेक्षित आहे. त्यामुळे ती माहिती फक्त ओबीसी समूहातील ज्या जाती आहेत त्यांच्यामध्येच शोधणे आवश्यक आहे. असे असताना इतर जातींची सुद्धा जनगणना याद्वारे करण्यात येत आहे. यामध्ये धर्म म्हणून बौद्ध धर्माचा कॉलम दिसून येत नाही. यामुळे अंतिम जनगणना झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये बौद्ध धर्माचे अस्तित्व दिसून येणार नाही. त्यामुळे सदोष माहिती शासन दरबारी जमा होईल. ही जनगणना तत्काळ थांबवून दोषरहित ज्यामध्ये बौद्ध धर्माचा उल्लेख असेल असे ॲप कर्मचाऱ्यांना देऊन नव्याने जातीय जनगणना करण्यात यावी, अशी मागणी वंचित युवा आघाडीच्या वतीने सतीश पवार यांनी केली आहे.



भविष्यातील दुष्परिणाम लक्षात घ्या; अन्यथा आंदोलन छेडू सदोष जातीनिहाय जनगणना झाल्यास भविष्यामध्ये शासन दरबारी बौद्ध धर्माची संख्या ही शून्य होईल, त्याचा दुष्परिणाम बौद्ध समुदायाप्रती असलेल्या धोरणावर, योजनांवर तसेच आरक्षित जागांवरदेखील पडेल, असे नमूद करतानाच शासनाने मागणीची दखल न घेतल्यास नाइलाजाने आम्हाला शासन व प्रशासनाविरोधात न्याय्य हक्कासाठी तीव्र व व्यापक स्वरूपाचे आंदोलन उभे करावे लागेल, असा इशारा सतीश पवार यांनी दिला आहे.

# दगडाचे मोल ठरले अनमोल...

एका सद्गृहस्थाच्या घरात एक दगड होता . तो अनेक ठिकाणी कामी यायचा. म्हणून त्याने तो ठेवला होता. दरवाजा अपोआप पुढे जाऊ लागला कि त्याला दरवाजाला लावायचा, मुलांना काही खेळायचे असल्यास तोच दगड, घरात कुत्र आल, सौभाग्यवतींनी फेकून मारला, अशा असंख्य कामाला यायचा म्हणून तो दगड खितपत घरात पडला होता.वापरून वापरून त्याची झीज झाली होती आणी गोल घुमट झाला होता. एक दिवस त्या सद्गृहस्थांच्या घरी एक पाहुणे आले. सहज नजर पडली त्या दगडावर तर त्याची झीज होऊन होऊन एका बाजूने थोडा चमकत होता. सराफ कुळातील असल्याने त्यांनी परीक्षण केले आणी म्हणाले काय हो हे इतका मौलिक रत्न तुम्ही घराच्या दाराला अडसर म्हणून उभा केलांत ? न समजून त्या सद्गृहस्थाने त्यांना प्रश्न उलट प्रश्न केला. ते रत्नपारखी म्हणाले, अहो खरंच हा साधासुधा दगड नसून अलौकिक रत्न आहे . ते आज त्याची किंमत १० कोटीच्या घरात तरी असेल.झाले ! दगडाचे जीवनच बदलले. खसकन त्या गृहस्थाने तो दगड पाहुण्यांच्या हातून खेचला आणी



तिजोरीत ठेवला. मग कालपर्यंत नीच कामासाठी वापरता येणारा हा दगड आत्ता अलौकिक रत्न बनून तिजोरीत राहत होता !दृष्टांत संपला आत्ता सिद्धांत. नरदेह हा सुद्धा त्याच दगडा सारखा आहे. तुम्ही आम्ही त्याला उगीच खितपत ठेवला आहे. नको त्या कामाला लावला आहे. मग एक दिवस सद्गुरूसारखा रत्नपारखी भेटला आणी मग त्याने या नरदेहाची किंमत दाखवली आणी नंतरच त्याला तिजोरी प्राप्त झाली. म्हणून म्हणतो, परमार्थाला आपण तोवर लागत नाही ; जोवर या जन्माची किंमत कळत नाही.आणी जोवर ती कळत नाही तोवर परमार्थाचा अधिकारी नाही होऊ शकत.ती जाणून घ्या आपण कशाला मनुष्य जन्माला आलोय आणी काय करतोय ,याच चिंतन करा.

**जय श्री सियाराम**

# राज्य क्रीडा पुरस्कारासाठी सुधारीत नियमावली जाहीर

राज्य क्रीडा पुरस्कारासाठी सुधारीत नियमावली जाहीर

**जनसंचलन/बुलडाणा**

शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार दिव्यांग खेळाडू, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार साहसी उपक्रम या पुरस्कारांच्या नियमावलीत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार इक्वेस्ट्रियन, गोल्फ, यॉटींग, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलियर्डस् ॲण्ड स्नूकर, सॉफ्टबॉल पुरुष व बेसबॉल महिला आणि जिम्नॅस्टिक्स एरोबिक्स, ॲक्रोबॅटिक्स या खेळांसाठी अर्ज सादर करता येणार आहे सुधारीत नियमावलीनुसार पुरस्काराकरीता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीनुसार पुरस्काराकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत. यातील पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीमध्ये शासनाने दि. २५ जानेवारी, २०२४च्या शासन निर्णयानुसार



सुधारणा केली आहे. शासनाच्या दि. २९ डिसेंबर २०२३ रोजीचा शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ४.४ येथे इक्वेस्टरियन, गोल्फ, यॉटींग, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलीयर्डस ॲन्ड स्नूकर, सॉफ्टबॉल पुरुष व बेसबॉल महिला या खेळांचा समावेश करण्यास व मॉडर्न पेंटॅथलॉन या खेळामध्ये गुणांकन करताना ट्रेट्राथलॉन या उपप्रकाराचा विचार शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार २०२२-२३ मध्ये करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. पुरस्काराकरीता विहित केलेला अर्ज क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे दि. २५ ते ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्ज स्वीकारण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे कार्यालय कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवशी देखील सुरु ठेवण्यात येणार आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी कळविले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अखेर राणीने लावला पत्नीला संपविणाऱ्या पतीचा शोध...

## वडनेर येथील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस अटक

**जनसंचलन/ वडनेर भोलजी**

वडनेर शेत शिवारात २१ जानेवारी रोजी गंगा नितीन कळस्कार यांचा चाकूने वार करून, दगडाने ठेचून खून करण्यात आला होता, याप्रकरणी सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर या महिलेचा पतीच आरोपी निघाला असून, त्याला पोलिसांनी अटक केली आहे. गंगा कळस्कार यांची हत्या झाल्यानंतर पती नितीन कळस्कार यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याच्या तपासात पोलिसांनी घटनास्थळी श्वान पथक आणि फिंगरप्रिंट एक्सपर्ट बोलविले. तपासामध्ये पोलिसांना त घटनास्थळी एक चाकू व आरोपीचा नी दुपट्टा सापडला. पोलिस श्वान रानीला ले चाकूचा गंध दिला असता मृत महिलेचा पती आरोपी नितीन एकनाथ कळस्कार यांचा मार्ग दाखवला तसेच रुमाल दुपट्ट्याचा गंध दिला असता आरोपी नितीन कळस्कार याच्याकडेच मार्ग दाखवला. गुन्ह्यातील चाकूही आरोपीच्या घरातील होता. तसेच गुन्ह्याच्या वेळी आरोपीचे मोबाइल लोकेशन घटनास्थळी शेतातच आढळले. तसेच आरोपी शेतात जात असल्याचे सीसीटीव्ही कॅमे-यातून फुटेज मिळाल्याने नांदुरा पोलिसांनी आरोपी मृत महिलेचा पती नितीन एकनाथ कळस्कार (वय ४४) याला अटक केली. पुढील तपास नांदुरा पोलीस करीत आहे ही कारवाई पोलिस अधीक्षक सुनील कडासने, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, एसडीपीओ गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विलास पाटील, सहायक पोलिस निरीक्षक नागेश



जायले, कैलास सुरडकर, मिलिंद जवंजाळ, राहुल ससाने, विनोद भोजने, मानकर झगरे, रविंदर सावले, महिला अंमलदार कल्पना गिरी, दीपाली सुरडकर यांनी केली. आरोपीला २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत हेल्मेट रॅली

**जनसंचलन/बुलढाणा**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त शहरातून हेल्मेट रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी हेल्मेट रॅलीला हिरवी झेंडी दाखविली. हेल्मेट रॅली शहरातून जिल्हाधिकारी कार्यालय, स्टेट बँक चौक, तहसिल चौक, त्रिशरण चौक, सर्कुलर रोड मार्गे धाड नाका, जयस्तंभ चौक मार्गे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयापर्यंत काढण्यात आली. यावेळी शिपाई संवर्गातील कर्मचारी व सफाई कामगारांना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहन चालकाचे नेत्र तपासणी शिबीर घेण्यात



आले. पोलीस अधिक्षक सुनिल कडासने यांच्या अध्यक्षेत स्कुल बस समितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर पोलीस अधिक्षक बाबुराव महामुनी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, मुख्याधिकारी गणेश पांडे, शिक्षणाधिकारी सिध्देश्वर काळुसे, उपस्थित होते. उपस्थितांनी रस्ता सुरक्षा संबंधी मार्गदर्शन केले. तसेच वाहतुकीच्या नियमाचे पालन करण्याचे आवाहन केले.

# मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तर्फे १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेला जाता जाता समुपदेशन...

**जनसंचलन/बुलढाणा**

मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तर्फे १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेला जाता जाता समुपदेशन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठ द्वारा संचालीत मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तर्फे १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेला जाता जाता समुपदेशन हा कार्यक्रम सरस्वती विद्यालय बुलढाणा येथे दि.२४/०१/२४ घेण्यात आला. कार्यक्रमात प्रा. सुनीता गायकी यांनी विद्यार्थ्यांची मानसिक, शारिरीक स्वास्थ्य कसे राखावे यावर मार्गदर्शन केले. तसेच प्रा. शीला दाभाडे यांनी परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांनी मोबाईल आपल्यापासून दूर ठेवावा. तसेच १२ वी च्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत पेपर कसा सोडवावा यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्रा. वसुधा



घुमरे यांनी विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यासाठी ब्रेन घेऊन त्यांचे मनोबल वाढविले. प्रा. समृद्धि गोडबोले यांनी कार्यक्रमांचे प्रास्ताविक केले.व विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थीत होती. तसेच सरस्वती विद्यालायाचे प्राचार्य: अमोदकर व प्राध्यापकवृद यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रम मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसने यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलढाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# बुलढाण्यात आमदार धर्मवीर चषक क्रिकेट २०२४ स्पर्धेचे थाटात उद्घाटन संपन्न...

### प्रथम बक्षीस ०७ लक्ष रुपये तर द्वितीय बक्षीस ३.५० लक्ष रुपयासह मॅन ऑफ द सिरीजसाठी टीव्ही एस रायडर नावाची नामांकित मोटारसायकल यासह लाखों रुपयाचे पुरस्कार होणार वितरित...



**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिजामाता प्रेक्षागार क्रीडा संकुलमध्ये धर्मवीर आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे सदर स्पर्धेचे उदघाटन आज दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी आमदार संजय गायकवाड यांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेकरिता जवळपास साडेसात लाख रुपयाचे प्रथम बक्षीस ठेवण्यात आलेले आहेत. बुलढाणा येथील लोकप्रिय आमदार संजय गायकवाड यांच्या संकल्पनेतून आयोजित आमदार चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन येथील जिजामाता क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनानंतर प्रथम सामना हा मोताळा येथील सुवर्णमयूर क्रिकेट क्लब विरुद्ध केसापूर इलेव्हन यांच्यात खेळवला गेला. दरम्यान स्पर्धेच्या प्रारंभी पुढारी वर्से स पत्रकार यांचा सामना रंगला. सदर सामन्याकरिता दोन गट तयार करण्यात आलेले आहे प्रत्येक गटात १० संघाचा समावेश करण्यात आलेला आहे. वनी,लातूर खामगाव,गुजरात,वाराणसी, भोकरदन,चिखली,बुलढाणा,संभाजीनगर,नागपूर, येथील संघाचा समावेश झाला आहे.सदर स्पर्धेसाठी अंतिम सामना हा ०४ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजता घेण्यात येणार आहे, या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या ठिकाणी युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, धर्मवीर आखाडा अध्यक्ष पृथ्वीराज संजय गायकवाड,जीवन उबरहंडे, नितीन नेमाने, स्वप्निल पाटील,विशाल खंडारे,नितीन पाटील,सागर उबाळे, दीपक तुपकर, श्रीकृष्ण शिंदे,नितीन सुपे नितीन राजपूत,गणेश राजस, राजेश पडोळकर, प्रवीण निमकर्डे, ज्ञानेश्वर खांडवे,विजय काळवाघे,अजय बिह्लारी, गोटू शर्मा,तुषार काटेकर,ओम सोनुने,प्रसाद फदाट,यांच्यासह धर्मवीर क्रीडा स्पर्धेचे सर्व सन्माननीय सभासद तसेच जास्तीत जास्त संख्येने क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

# उद्योग, कामगार, सामाजिक न्याय, माहिती व जनसंपर्क या चार विभागांच्या वार्षिक कार्यक्रम २०२४-२५ च्या आखणीचा अजित पवार यांनी घेतला आढावा...

# नवीन उद्योगांसह विस्तारासाठीचे परवाने किमान वेळेत देण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

वृत्तसंस्था/मुंबई

देशाची अर्थव्यवस्था वर्ष २०२८ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आखला आहे. यामध्ये एक ट्रिलियन डॉलरचे योगदान देण्यासाठी महाराष्ट्राने कृती आराखडा तयार केला आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी उद्योग, कामगार विभागाची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. नवीन उद्योगांच्या स्थापनेसह अस्तित्वातील उद्योगांच्या विस्तारासाठी लागणारे सर्व परवाने कमीत कमी वेळेत दिले गेले पाहिजेत. ग्रामीण भागात उद्योग येण्यासाठी अधिकाधिक सवलत, प्रोत्साहन दिले जावे. उद्योगांना राज्यामार्फत देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा, सवलती, प्रोत्साहने याबाबतची माहिती ङ्गमैत्रीफ कक्षाच्या माध्यमातून संबंधितांपर्यंत पोहोचवावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज सह्याद्री अतिथीगृहात आयोजित बैठकीत विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सह्याद्री अतिथीगृहात सामाजिक न्याय, कामगार, माहिती व जनसंपर्क, उद्योग या चार विभागांच्या वार्षिक कार्यक्रम २०२४-२५ आखणीसंदर्भात राज्यस्तरीय आढावा घेतला. बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत (व्हीसीद्वारे), कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (व्यय) ओमप्रकाश गुप्ता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, सामाजिक न्याय आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, उद्योगविकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) हेमराज बागुल आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विभागांच्या वार्षिक योजनांबाबत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यातील तरुण-तरुणींच्या हाताला रोजगार मिळेल, नागरिकांना थेट लाभ मिळेल, दरडोई उत्पन्नात वाढ होईल, राज्याचा महसूल वाढेल अशा योजनांना वार्षिक योजनांच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात येईल. उद्योजकांचा राज्यावरील विश्वास वाढविण्यासाठी उद्योजकांसाठी जाहीर केलेल्या प्रोत्साहनांची वेळेत पूर्तता करण्यात येईल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना प्रभावीपणे राबवितानाच सौर ऊर्जा, हरित हायड्रोजन, वस्त्रोद्योग, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांसाठी पोषक वातावरण तयार करण्यात येईल. उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन आणि राज्य कामगार विमा योजनेची रुग्णालये उभारण्यास प्राधान्य द्यावे. जागा निश्चित झालेल्या सातारा, सोलापूर, धुळे, वाशिम या चार जिल्ह्यांमधील कामगार भवनाच्या कामाला गती द्यावी. राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयांच्या आवारात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करून त्यांची योग्य सांगड घालावी. ङ्गअटल पेन्शनफ्सारख्या शाश्वत सामाजिक सुरक्षा देणाऱ्या योजनांचा जास्तीत जास्त कामगारांना लाभ होण्यासाठी प्रयत्न करावा. असंघटित कामगार कल्याण मंडळ, घरेलू कामगार कल्याण मंडळ, असंघटित कामगार प्राधिकरणाच्या माध्यमातून कामगार कल्याणाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात. उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना सामाजिक, आर्थिक सुरक्षितता देण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या. मागासवर्गीय मुला-मुलींच्या निवासासाठी राज्यात विविध ठिकाणी बांधण्यात आलेल्या सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमध्ये दर्जेदार फर्निचर उपलब्ध करून द्यावे. गुणवत्तापूर्ण, टिकाऊ फर्निचरच्या पुरवठ्यासाठी नावाजलेल्या कंपन्यांचा थेट सहभाग घेण्याबाबत विचार करावा. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा निधी कोणत्याही



कारणामुळे थकित राहता कामा नये. थेट लाभ हस्तांतर (डीबीटी) यंत्रणेच्या माध्यमातून संपूर्ण शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करा. अनुसूचित जाती योजनांसाठी १०० टक्के ङ्गडीबीटीफ्चा वापर करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. शासनाचे नवनवीन उपक्रम, योजना, निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, लाभार्थ्यांच्या उपयोगाची माहिती कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. मुद्रित, दूरचित्रवाणी, नभोवाणी या पारंपरिक माध्यमांबरोबरच सामाजिक माध्यमे, डिजिटल माध्यमे, आऊटडोअर माध्यमे, विविध लोककला, डिजिटल फलकांचाही वापर करण्यात यावा. राज्यात नागरिकांचा कायम वावर असणाऱ्या शासकीय, निमशासकीय, महामंडळांच्या कार्यालयांसह इतर महत्त्वाच्या ठिकाणी योजनांची प्रसिद्धी करावी. शासकीय कार्यालयांसह गर्दीच्या ठिकाणी होर्डिंगची उभारणी करून माहिती व जनसंपर्कने प्रसिद्धीचे नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी बैठकीत दिल्या.

## शेतकऱ्यांनी शेतीला प्रयोगशाळा मानून प्रयोग करावेत-खासदार प्रतापराव जाधव

# मेहकर येथे कृषि महोत्सव,प्रदर्शनीला सुरवात...

जनसंचलन/बुलडाणा

शेती नफ्याची होण्यासाठी पुढच्या पिढीवर सकारात्मक संस्कार होणे गरजेचे आहे. कष्ट केल्यानंतर शेती नफ्याची होते. तसेच शेती ही एक प्रयोगशाळा आहे, या शेतीमध्ये जेवढे जास्त प्रयोग केले जातील, तेवढी त्यात सुधारणा होईल, असे मत खासदार प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले. कृषि प्रदर्शनीचे उद्घाटन आज खासदार प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार संजय रायमुलकर स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, विभागीय कृषि सहसंचालक किसन मुळे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे, मेहकर बाजार समितीचे सभापती माधव जाधव, लोणार बाजार समितीचे सभापती बळीराम मापारी, मेहकर बाजार समितीचे उपसभापती विलास मेहरूत, लोणार बाजार समितीचे उपसभापती जगाराव आडे उपस्थित होते. खासदार जाधव म्हणाले, शेतमध्ये विविध प्रयोग करणे शक्य आहे. या प्रयोगातून शेतीची उत्पादकता वाढते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांनी पारंपरीक पद्धतीने शेती करण्याऐवजी आधुनिक पद्धतीने शेती करावी. खतांचा वापर करताना संतुलीत मात्रे खतांचा उपयोग केल्यास शेतपिकांपासून चांगले उत्पादन मिळण्यास मदत होईल. कृषि प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी, आजही आपली शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे उत्पादनावर परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पूरक व्यवसायाची कास धरावी. शेतीसोबत




जोडधंदा केल्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होऊन आर्थिक प्रगती होण्यास मदत मिळत असल्याचे सांगितले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त कृषि विभागातर्फे मेहकर येथील राजश्री आयुर्वेदिक महाविद्यालयासमोरील प्रांगणात कृषि महोत्सव आणि कृषि प्रदर्शनीस आजपासून सुरुवात करण्यात आली. दि. २९ जानेवारीपर्यंत कृषि महोत्सव सुरू राहणार आहे. नागरिकांनी या कृषि प्रदर्शनीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते होणार ध्वजवंदन...

जनसंचलन/बुलढाणा

प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते शुक्रवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता पोलीस कवायत मैदान येथे ध्वजवंदन होणार आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. श्री. वळसे पाटील हे शुक्रवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता शासकीय विश्राम भवन येथून निघून ९.१५ वाजता भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वज वंदन, संचलन समारंभ व इतर कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १.३० वाजता सिंदखेड राजा येथील दि चिखली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. शाखा सिंदखेडराजाच्या नुतन वास्तू उद्घाटन व स्थानांतरण सोहळा कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी



३.३० वाजता मेहकर येथील राजश्री आयुर्वेदिक महाविद्यालय समोरील प्रांगण येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५व्या जयंतीवर्षानिमित्त कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा, कृषी विभाग आणि मेहकर, लोणार कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे आयोजित श्री अन्न निरंतर कृषी महोत्सव व कृषी प्रदर्शनास भेट देतील. त्यानंतर हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गे नाशिककडे प्रयाण करतील.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958